असा. क्र. १७ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, एप्रिल २७, २००६/वैशाख ७, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.**–मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . **१४९-१५३**

. दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

## सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक २७ एप्रिल २००६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८, यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१९५८ चा मुंबई ६०. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सत्तावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई मुद्रांक (सुधारणा) अधिनियम, २००६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येईल.

१९५८ चा मुंबई ६०. **२.** मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ (यात यापुढे ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा करण्यात आला आहे), याच्या कलम २ मध्ये, खंड (गअ) मधील, "राज्य शासनाने" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "प्रदान केले आहेत" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, "राज्य शासनाने अशा प्रकारे पदनिर्देशित केलेला असा अधिकारी सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम २ ची सुधारणा.



[**किंमत** : रुपये ९.००]

किंवा असे अधिकारी, असा आहे आणि यात राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, त्याबाबतीत नेमून देता येईल अशा अन्य कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या कलम ५२अ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५२अ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

शुल्काबाबत सवलत देणे.

" **५२अ.** कलमे ४७, ५०, ५१ व ५२ यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १० च्या पोट-कलम (३) किंवा कलम १०अ किंवा कलम १०ब अन्वये तरतूद केल्याप्रमाणे, मुद्रांकाद्वारे किंवा रोखीने शुल्क भरले असेल आणि भरण्यात आलेल्या शुल्काची रक्कम एक लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, संबंधित जिल्हाधिकारी, खराब झालेल्या किंवा गैरवापर केलेल्या किंवा वापरासाठी आवश्यक नसलेल्या मुद्रांकांच्या बाबतीत किंवा चलानांद्वारे भरलेल्या रोख रकमेच्या बाबतीत सवलत देणार नाही ; परंतु, तो, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर, त्यावरील आपल्या शेऱ्यासह असा अर्ज,—

(अ) मुंबई शहर जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा यांमध्ये काम करीत असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांनी हाताळलेल्या प्रकरणांकरिता, अपर मुद्रांक नियंत्रक याच्याकडे पाठवील ; आणि

(ब) खंड (अ) मध्ये नमूद केलेल्या जिल्हाधिकाऱ्याव्यतिरिक्त, अन्य जिल्हाधिकाऱ्यांनी हाताळलेल्या प्रकरणांकरिता, विभागाचा संबंधित नोंदणी उप महानिरीक्षक आणि मुद्रांक उप नियंत्रक याच्याकडे पाठवील.

(२) अपर मुद्रांक नियंत्रक किंवा, यथास्थिति, विभागाचा संबंधित नोंदणी उप महानिरीक्षक आणि मुद्रांक उप नियंत्रक, असा अर्ज मिळाल्यावर, त्यावर विचार करील आणि अशी सवलत द्यावी किंवा कसे याचा निर्णय घेईल आणि तदनुसार, सवलतीची रक्कम दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, ती सवलत मंजूर करील आणि ती दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर, असा अर्ज, त्यावरील आपल्या शेऱ्यासह, मुख्य नियंत्रक महसुली प्राधिकाऱ्याकडे निर्णयासाठी सादर करील.

(३) मुख्य नियंत्रक महसुली प्राधिकारी, असा अर्ज मिळाल्यावर, अशी सवलत द्यावी किंवा कसे याबाबत गुणवत्तेनुसार निर्णय घेईल आणि त्यास न्याय्य व योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यावर आदेश देईल आणि तो आदेश अंतिम असेल आणि त्यावर कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणात आक्षेप घेता येणार नाही. ".

४. मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची एक मध्ये,— सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६० याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

(१) अनुच्छेद ५ मधील, खंड (ह) च्या, उप-खंड (अ) मध्ये,—

(क) नोंद (चार) मध्ये, स्तंभ २ मधील, " दोन रुपये पन्नास पैसे " या मजकुराऐवजी, " एक रुपया " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) नोंद (पाच) नंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| " (सहा) बांधा, वापरा व हस्तांतरित करा पद्धतीखालील प्रकल्प—मग तो पथकर किंवा फी वसूल करण्याचा हक्क यांसह असो किंवा यांव्यतिरिक्त असो. | किमान १०० रुपयांचा व कमाल ५,००,००० रुपयांच्या अधीनतेने संविदा मूल्याच्या दर १,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता एक रुपया." ; |

(२) अनुच्छेद ६ मधील,—

(क) खंड (१) मधील, स्तंभ २ मध्ये,—

(एक) " पाच रुपये " या मजकुराऐवजी, " एक रुपया " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " दहा लाख रुपयांच्या " या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपयांच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (२) मधील, स्तंभ २ मध्ये,—

(एक) " पाच रुपये " या मजकुराऐवजी, " एक रुपया " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " दहा लाख रुपये " या मजकुराऐवजी, " पाच लाख रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) अनुच्छेद २५ मधील, खंड (ड) मध्ये, उप-खंड (१) च्या, नोंद (ड) मध्ये,—

(एक) उप-नोंद (एक) मधील,—

(क) स्तंभ १ मध्ये, " १,००,००० " या आकड्यांऐवजी, " २,५०,००० " हे आकडे दाखल करण्यात येतील ;

(ख) स्तंभ २ मध्ये, " काही नाही " या मजकुराऐवजी, " शंभर रुपये " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) उप-नोंद (दोन) वगळण्यात येईल ;

(तीन) उप-नोंद (तीन) मध्ये, स्तंभ २ मध्ये, " १,२५० " या आकड्यांऐवजी, " १०० " हे आकडे दाखल करण्यात येतील ;

(चार) उप-नोंद (चार) मध्ये, स्तंभ २ मध्ये, " ८,७५० " या आकड्यांऐवजी, " ७,६०० " हे आकडे दाखल करण्यात येतील ;

(४) अनुच्छेद ३६अ मधील, खंड (अ) मध्ये, उप-खंड (एक) च्या, नोंद (१) मध्ये,—

(क) उप-नोंद (क) मधील, स्तंभ १ मध्ये, " दहा लाख रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी, " वीस लाख रुपयांपेक्षा " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) उप-नोंद (ड) मधील, स्तंभ १ मध्ये, " दहा लाखांहून " या मजकुराऐवजी " वीस लाखांहून " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(५) अनुच्छेद ४० मधील, खंड (क) नंतर, स्तंभ १ मध्ये, पुढील स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात येईल :—

" **स्पष्टीकरण.—** या खंडाच्या प्रयोजनार्थ, " प्रमुख किंवा प्राथमिक प्रतिभूती " याचा अर्थ, वरील खंड (अ) किंवा (ब) अन्वये निर्माण केलेली प्रतिभूती, असा आहे. ";

(६) अनुच्छेद ५२ ऐवजी, पुढील अनुच्छेद दाखल करण्यात येईल :—

| | |
|---|---|
| " **५२. परिमोचनपत्र.**—याचा अर्थ, ज्या संलेखाद्वारे (ज्याविषयी, कलम २४ मध्ये तरतूद केली आहे असा संलेख नसणारा) एखादी व्यक्ती इतर व्यक्तीसाठी किंवा विनिर्दिष्ट मालमत्तेवरील हक्कमागणी सोडून देते असा कोणताही संलेख असा आहे— | |
| (अ) जर वडिलोपार्जित मालमत्ता किंवा तिचा भाग यासंबंधातील परिमोचनपत्र, भाऊ किंवा बहीण (हक्क सोडून दिलेल्या व्यक्तीच्या आईवडिलांची मुले) अथवा मुलगा किंवा मुलगी अथवा पूर्वी मरण पावलेल्या मुलाचा मुलगा अथवा पूर्वी मरण पावलेल्या मुलाची मुलगी अथवा हक्क सोडून दिलेल्या व्यक्तीचे वडील किंवा आई अथवा पती/पत्नी, किंवा वरीलपैकी नातेसंबंध असणाऱ्या व्यक्तीचे कायदेशीर वारस यांनी किंवा त्यांच्या नावाने केले असेल तर. | दोनशे रुपये. |
| (ब) इतर कोणत्याही बाबतीत. | सोडून दिलेला हिस्सा, हितसंबंध, भाग किंवा हक्कमागणी यांच्या बाजारमूल्यावर अभिहस्तांतरणपत्राच्या बाबतीत अनुच्छेद २५ च्या खंड (अ), (ब), (क) किंवा, यथास्थिति, (ड) अन्वये जेवढे शुल्क आकारणी योग्य असते तितके शुल्क."; |

(७) अनुच्छेद ५४ मधील, खंड (दोन) च्या, स्तंभ २ मधील, परंतुकामध्ये " ६ किंवा " हा मजकूर वगळण्यात येईल ;

(८) अनुच्छेद ६२ नंतर, पुढील अनुच्छेद जादा दाखल करण्यात येईल :—

" **६३. कार्यकंत्राट.—** याचा अर्थ, कामांचे आणि ती पार पाडताना लागणाऱ्या कामगारांसाठीचे वा सेवांचे कंत्राट असून त्यात मालाच्या स्वरूपातील मालमत्तेचे हस्तांतरण (मग ते मालाचे म्हणून असो किंवा अन्य काही स्वरूपातील असो) करण्यासाठी असलेली सेवा अंतर्भूत आहे आणि त्यात उपकंत्राटाचा समावेश होतो,—

| | |
|---|---|
| (अ) अशा कंत्राटामध्ये ठरविण्यात आलेली रक्कम किंवा मूल्य दहा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर. | शंभर रुपये. |
| (ब) ते दहा लाख रुपयांपेक्षा अधिक असेल तर. | पाच लाख रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून शंभर रुपये अधिक दहा लाख रुपयांवरील रकमेसाठी दर १,००,००० रुपयांकरिता किंवा त्याच्या भागाकरिता १०० रुपये.". |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४१ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**गुरुवार, एप्रिल २७, २००६/वैशाख ७, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग आठ

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Bombay Stamp (Amendment) Act, 2006 (Mah. XII of 2006), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XII OF 2006.

*(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 27th April 2006.).*

An Act further to amend the Bombay Stamp Act, 1958.

Bom. LX of 1958.

WHEREAS it is expedient further to amend the Bombay Stamp Act, 1958, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Bombay Stamp (Amendment) Act, 2006.

(*2*) It shall come into force on such date, as the State Government may, by notification in the *Official Gazette,* appoint.

Amendment of section 2 of Bom. LX of 1958.

**2.** In section 2 of the Bombay Stamp Act, 1958 (hereinafter referred to as " the principal Act "), in clause (*ga*), for the portion beginning with the words " appointed by the State Government " and ending with the words " are conferred " the words " so designated by the State Government and includes any other officer whom the State Government may, by notification in the *Official Gazette,* appoint in this behalf " shall be substituted. Bom. LX of 1958.

Substitution of section 52A of Bom. LX of 1958.

**3.** For section 52A of the principal Act, the following section shall be substituted, namely :—

Allowance for Duty.

" **52A.** (*1*) Notwithstanding anything contained in sections 47, 50, 51 and 52, when payment of duty is made by stamps or in cash as provided for under sub-section (*3*) of section 10 or section 10A or section 10B, and when the amount of duty paid exceeds rupees one lakh, the concerned Collector shall not make allowance for the stamps, or the cash amount paid under the *Challans,* which are spoilt or misused or not required for use, but shall, after making necessary enquiries, forward the application with his remarks thereon to,—

(*a*) the Additional Controller of Stamps for the cases handled by the Collectors working in the Mumbai City District and Mumbai Suburban District ; and

(*b*) the concerned Deputy Inspector General of Registration and Deputy Controller of Stamps of the division for the cases handled by the Collectors other than those mentioned in clause (*a*).

(*2*) The Additional Controller of Stamps or, the concerned Deputy Inspector General of Registration and Deputy Controller of Stamps of the division, as the case may be, on receiving such application consider the same and decide whether such allowance shall be given or not, and accordingly shall, grant the same, if the amount of allowance does not exceed rupees ten lakh, and if, it exceeds rupees ten lakh, shall submit such application, with his remarks thereon to the Chief Controlling Revenue Authority for decision.

(*3*) The Chief Controlling Revenue Authority on receiving such application shall decide on merit whether such allowance shall be given or not, and pass such order thereon as he thinks just and proper, which shall be final and shall not be questioned in any court or before any authority.".

**4.** In the Schedule I appended to the principal Act,— Amendment to Schedule I of Bom. LX of 1958.

(*1*) in article 5, in clause (*h*), in sub-clause (*A*),—

(*A*) in entry (*iv*), in column 2, for the words " Two rupees and fifty *paise* " the words " One rupee " shall be substituted ;

(*B*) after entry (*v*), the following entry shall be inserted, namely :—

| | |
|---|---|
| " (*vi*) project under Built, Operate and Transfer (BOT) system, whether with or without toll or fee collection rights. | One rupee for every rupees 1,000 or part thereof of the contractual value subject to minimum of rupees 100 and maximum of rupees 5,00,000." ; |

(*2*) in article 6,—

(*A*) in clause (*1*), in column 2,—

(*i*) for the words " Five rupees" the words " One rupee " shall be substituted ;

(*ii*) for the words " ten lakh rupees " the words " five lakh rupees " shall be substituted ;

(*B*) in clause (*2*), in column 2,—

(*i*) for the words " Five rupees" the words " One rupee " shall be substituted ;

(*ii*) for the words " ten lakh rupees " the words " five lakh rupees " shall be substituted ;

(*3*) in article 25, in clause (*d*), in sub-clause (*1*), in entry (*D*),—

(*i*) in sub-entry (*i*),—

(*a*) in column 1, for the figures " 1,00,000 " the figures " 2,50,000 " shall be substituted ;

(*b*) in column 2, for the word " Nil " the words " One hundred rupees " shall be substituted ;

(*ii*) sub-entry (*ii*) shall be deleted ;

(*iii*) in sub-entry (*iii*), in column 2, for the figures " 1,250 " the figures " 100 " shall be substituted ;

(*iv*) in sub-entry (*iv*), in column 2, for the figures " 8,750 " the figures " 7,600 " shall be substituted ;

(*4*) in article 36A, in clause (*a*), in sub-clause (*i*), in entry (*1*),—

(*A*) in sub-entry (*C*), in column 1, for the words " rupees ten lakh " the words " rupees twenty lakh " shall be substituted ;

(*B*) in sub-entry (*D*), in column 1, for the words " rupees ten lakh " the words " rupees twenty lakh " shall be substituted ;

(*5*) in article 40, after clause (*c*), in column 1, the following *Explanation* shall be added, namely :—

" *Explanation.*—For the purpose of this clause, " the principal or primary security " shall mean, the security created under clause (*a*) or (*b*) above." ;

(*6*) for article 52, the following article shall be substituted, namely :—

| | |
|---|---|
| " 52. RELEASE, that is to say, any instrument (not being an instrument as is provided by section 24) whereby a person renounces a claim upon other person or against any specified property,— | |
| (*a*) if the release deed of an ancestral property or part thereof is executed by or in favour of brother or sister (children of renouncer's parents) or son or daughter or son of predeceased son or daughter of predeceased son or father or mother or spouse of the renouncer or the legal heirs of the above relations. | Two hundred rupees. |
| (*b*) in any other case. | The same duty as is leviable on a conveyance under clause (*a*), (*b*), (*c*) or (*d*), as the case may be, of Article 25, on the market value of the share, interest, part or claim renounced." ; |

(*7*) in article 54, in clause (*ii*), in column 2, in the proviso, the figure and word " 6 or " shall be deleted ;

(*8*) after article 62, the following article shall be added, namely :—

| | |
|---|---|
| " 63. WORKS CONTRACT, that is to say, a contract for works and labour or services involving transfer of property in goods (whether as goods or in some other form) in its execution and includes a sub-contract,— | |
| (*a*) where the amount or value set forth in such contract does not exceed rupees ten lakh. | One hundred rupees. |
| (*b*) where it exceeds rupees ten lakh. | One hundred rupees *plus* 100 rupees for every rupees 1,00,000 or part thereof, above rupees ten lakh, subject to the maximum of rupees five lakh.". |